राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अधिनस्त "स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला येथील शैक्षणिक पशुवैद्यकीय चिकित्सालय संकुलांचे व निदान प्रयोगशाळेचे बळकटीकरणे करणे" या प्रकल्पास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,

शासन निर्णय क्र. मपवि- २०१७/प्र.क्र. ६९/म्हापसू,

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२.

दिनांक : १५ डिसेंबर २०१७

<u>**संदर्भ**</u>:- कृषि व पदुम विभाग क्रमांक - आरकेव्ही-०३१७/सी.आर.१४/आरकेव्हीवाय कक्षाचे दि ९ जून २०१७ चे पत्र.

<u>प्रस्तावना</u> -

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला येथील शैक्षणिक पशुवैद्यकीय चिकित्सालय संकुलांचे शैक्षणिक व संशोधन कार्याकरिता आवश्यक त्या मुलभूत सुविधा निर्माण करण्यात याव्यात, ही बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार, दिनांक २५ मे २०१७ रोजी पार पडलेल्या राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या २३ व्या राज्यस्तरीय प्रकल्प मंजूरी समितीच्या बैठकीमध्ये या प्रकल्पास मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने, खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय -

सन २०१७-१८ व २०१८-१९ या कालावधीमध्ये, राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अधिनस्त स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला येथे "**शैक्षणिक पशुवैद्यकीय चिकित्सालय संकुलांचे व निदान प्रयोगशाळेचे बळकटीकरणे करणे"** ही योजना राबविण्यास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात येत आहे. तसेच, सदर प्रकल्पांतर्गत रू ४.५० कोटी एवढया खर्चास वित्तीय मंजुरी प्रदान करण्यात येत आहे. सदरचा प्रकल्प सन २०१७-१८ व २०१८-१९ या कालावधीमध्ये राज्यस्तरीय प्रकल्प मंजुरी समितीने मान्यता प्रदान केल्यानुसार व उपलब्ध होणाऱ्या निधीचे अधिन राहून राबविण्यात यावा.

२. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अधिनस्त स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला येथे "**शैक्षणिक पशुवैद्यकीय चिकित्सालय संकुलांचे व निदान प्रयोगशाळेचे बळकटीकरणे करणे"** या प्रकल्पांतर्गत खालील बाबी समाविष्ट आहेत.

अ.क्र	बाब	एकूण (रू. लाखात)
१	चिकित्सालयाचे विस्तारीकरण बांधकाम व नुतनीकरण इ.	१००.००
२	उपकरणे, फर्निचर इ.	३२६.०२
३	चिकित्सालय संकुल आवर्ती खर्च	१२.००
४	प्रशिक्षण	७.५०
	एकूण (१ ते ४)	४४५.५२
	प्रशासकीय खर्च १ टक्का	४.४८
	एकूण प्रशासकीय खर्च	**४५०.००**

३. या प्रकल्पांतर्गत उपलब्ध झालेला निधी व त्याचा विनियोग याबाबतचा हिशोब स्वतंत्रपणे विहित लेखा पध्दतीनुसार ठेवण्यात यावा, तसेच, उपलब्ध करून देण्यात आलेला निधी विहित कालमर्यादेत १०० टक्के खर्ची करून, त्याबाबतचे विहीत प्रपत्रातील उपयोगिता प्रमाणपत्र विद्यापीठाने आयुक्त पशुसंवर्धन यांच्यामार्फत शासनास सादर करावे. तसेच प्रकल्पाचा फलश्रुती अहवाल विद्यापीठाने आयुक्त पशुसंवर्धन यांच्यामार्फत शासनास सादर करावा.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा सांकेतांक २०१७१२१५११३१५४४२०१ आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नावाने व आदेशान्वये,

Vikas Tulshiram Kadam

Digitally signed by Vikas Tulshiram Kadam
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture and ADF Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9869ec61c857e78e82b7a19b04c6d22f8ef1b8dbc9b19d45ef776d80ef148059, cn=Vikas Tulshiram Kadam
Date: 2017.12.15 12:09:43 +05'30'

(विकास तु. कदम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत -

१. प्रधान सचिव, कृषि व पदुम विभाग (कृषि व पणन), मंत्रालय मुंबई - ३२.
२. आयुक्त पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य, पुणे - ६७.
३. आयुक्त कृषि महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. संचालक संशोधन, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर -०१.
५. कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर - ०१
६. उपसचिव (राष्ट्रीय कृषि विकास योजना कक्ष), कृषि व पदुम विभाग मंत्रालय मुंबई
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षण), मुंबई/नागपूर.
८. सहयोगी अधिष्ठाता, स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला.
९. कक्ष अधिकारी, राष्ट्रीय कृषि विकास योजना कक्ष, कृषि व पदुम विभाग मंत्रालय मुंबई - ३२.
१०. अवर सचिव, पदुम-४/कक्ष अधिकारी पदुम-१/१६ कृषि व पदुम विभाग मंत्रालय मुंबई - ३२.
११. निवड नस्ती माफसू.